॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. (१) - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एकावेळी दोन अभ्यासक्रम शिकण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याकरिता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमवेत सामंजस्य करारावर आज दि. १ सप्टेंबर रोजी स्वाक्षरी करून विद्यापीठाने नव्या शैक्षणिक धोरण अंमलबजावणी मध्ये एक महत्वाचे पाऊल पुढे टाकले आहे.

यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजय सोनवणे, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ, कबचौउमविचे प्र. कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिह बिसेन यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कबचौउमविचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी तर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड व एम. जी. एम. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी कबचौउमविने तयार केलेले यासंदर्भातील माहितीपत्रकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांच्या हस्ते तर विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त अशा पोर्टल फॉर टू डिग्री प्रोग्राम सायमंटेनिअसली या संकेतस्थळाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. संजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. हे पोर्टल विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळ www.nmu.ac.in यावर उपलब्ध आहे. या विद्यापीठांशी करार केल्यामुळे कबचौउमविच्या विद्यार्थ्यांना शेतीबाबतचा अभ्यासक्रम, ड्रोन तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ( औषधीशास्त्र, शेती तंत्रज्ञान) या सारखे अनेक नवनवीन अभ्यासक्रम नियमित पदवी करतांनाच शिकता येणार आहेत. विद्यार्थ्यांना यासोबतच नाविन्यपूर्ण अध्ययन, व्यक्तिमत्व विकास, नोकरीच्या विस्तृत संधी, करीअर पर्यायाची उपलब्धतता, व्यापक शैक्षणिक संधी असे अनेक फायदे होणार आहेत.

याप्रसंगी प्रा. विलास सपकाळ यांनी बोलताना सांगितले की, आगामी काळ विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांना शिक्षण घेण्यासाठी विद्यापीठांनी तसे अभ्यासक्रम तयार करून देण्याचा आहे. त्या अनुषंगाने या सामंजस्य करारा बाबत कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी चांगला पुढाकार घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गरज पूर्ण होणार आहे. असे सांगत त्यांच्या विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती दिली.

कुलगुरु प्रा. संजय सोनवणे यांनी सांगितले की, २०४७ मधील विकसित भारत या अनुषंगाने नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. आजचा करार हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. विद्यापीठांनी एकमेकांसोबत सहकार्य व संयुक्तपणे काम करून विकसित राष्ट्र घडविणे आवश्यक आहे. असे सांगून त्यांच्या विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती दिली.

कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुआयामी, लवचिक व आंतर विद्याशाखीय शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम शिकवण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. दोन नियमित अभ्यासक्रम तासिकांचे वेळापत्रक सकाळ/सायंकाळ अशा सत्रात ठेवून किंवा एक नियमित अभ्यासक्रम आणि एक दूरस्थ अभ्यासक्रम अशी सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे. ही व्यवस्था करून देणारे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे अग्रस्थानी आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना त्यांची आवड/छंद असलेला अभ्यासक्रम नियमित अभ्यासक्रमासोबत करता येईल. काळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्धतेसाठी किमान एक कौशल्य अभ्यासक्रम शिकणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक बी. पी पाटील, आय क्यू. ए. सी. संचालक प्रा. मधुकर शेवाळे, प्रा. हेमंत राजगुरू, एमजीएम विद्यापीठातर्फे आय क्यू. ए. सी. संचालक प्रा. परमिंदर कौर, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. मधुलिका सोनवणे, प्रा. आशुतोष पाटील, प्रा. समीर नारखेडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र-कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. विनोद पाटील तर आभार आय. क्यू. ए. सी. संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी मानले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १ सप्टेंबर , २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. (१) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेत प्रथम वर्ष प्रवेशित बी.टेक. च्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परिचय कार्यक्रम २०२५ (Induction Program 2025) चे आयोजन करण्यात आले असून आज आज दि. १ सप्टेंबर रोजी रसायन तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. ए. के. गोसावी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले.

विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या प्रवेश परिचय कार्यक्रम २०२५ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आज पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. उद्यापासून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रातील तज्ञांचे व्याख्यान, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास, रोजगाराभिमुख मार्गदर्शन, योगाभ्यास व करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात संस्थेचे संचालक प्रा. ए. के. गोसावी यांनी प्रवेश परिचय कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्त्व सांगत विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच विद्यार्थी हितासाठी कटिबद्ध असून विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात निश्चित सहभाग नोंदवावा असे आवाहन देखील त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवेश परिचय कार्यक्रमाचे समन्वय प्रा. विकास पाटील यांनी केले तर संस्थेतील विविध अभ्यासक्रमांच्या विभाग प्रमुख अनुक्रमे प्रा. विकास पाटील, प्रा. जे. एस. नारखेडे, प्रा. विशाल पराते, प्रा. पी. डी. मेश्राम, प्रा. आर. एस. सिरसाम, प्रा. यु. डी. पाटील, प्रा. उदय बागले यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना विभागाबद्दल विस्तृत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हर्षा कापडणे तर प्रा. विश्वराज तायडे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रशाळेतील बी टेक प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थी पालक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १ सप्टेंबर , २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता